# अदाणी इलेक्ट्रिसिटीकडून मुंबईकरांसाठी हरित ऊर्जा

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ८ : अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबईने (एईएमएल) २०२३ पर्यंत एकूण ३० टक्के वीज स्वच्छ अपारंपरिक ऊर्जास्रोतांमधून निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रस्तावाला राज्य वीज नियामक आयोगाने मान्यता दिल्यानंतर एईएमएलतर्फे याबाबतचे करार केले आहेत.

अदाणीतर्फे मुंबईतील सर्व ग्राहकांना हरित ऊर्जेचा पर्याय दिला जाईल व तो पर्याय स्वीकारणाऱ्या ग्राहकांना प्रमाणपत्र दिले जाईल. यातील ऊर्जेचा स्रोतही पारदर्शक पद्धतीने तपासता येणार आहे. त्याचबरोबर स्वच्छ अशा अपारंपरिक ऊर्जास्रोतांमधून तयार होणाऱ्या जादा एक हजार मेगावॉट वीजखरेदीचा प्रस्तावही नियामक आयोगाला देण्यात आला आहे.

पॅरिस करारांतर्गत भारताने मान्य केलेल्या अपारंपरिक ऊर्जेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अदाणीतर्फे हे प्रयत्न केले जात आहे. एईएमएल २०२३ पर्यंत अपारंपरिक ऊर्जेच्या माध्यमातून ३० टक्के ऊर्जानिर्मिती करणार आहे व लवकरच ५० टक्क्यांपर्यंत ऊर्जानिर्मिती करण्याचे एईएमएलचे ध्येय आहे.

स्वच्छ ऊर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी एईएमएल ग्राहक अतिरिक्त ६६ पैसे भरून १०० टक्के अपारंपरिक ऊर्जा खरेदी करू शकतील. मुंबई हरित ऊर्जा उपक्रम (मुंबई ग्रीन एनर्जी इनिशिएटिव्ह) हा पूर्णपणे ऐच्छिक असून एईएमएलच्या सध्याच्या आणि नव्या ग्राहकांसाठी खुला आहे, असे एईएमएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक कंदर्प पटेल यांनी सांगितले.